आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
Digital TV & Broadband Services

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ५२१ शनिवार दि २८ नोव्हेंबर २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

लोकसभेतील आकड्यांचं गणित काहीही असो, राहुल गांधी माघार घेणार नाहीत!

डिलिमिटेशन विधेयकाविरोधात काँग्रेसचा आरपारचा लढा

वृत्तसंस्था-मुंबई

मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्द्यावर सरकारच्या नव्या उपक्रमाविरोधात विरोधी पक्ष आघाडी उभारण्याची तयारी करत आहेत. पुढील आठवड्यात सुरू होणाऱ्या संसदेच्या अधिवेशनात हा मुद्दा प्रकर्षाने उपस्थित केला जाईल. विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक पाठिंबा मिळेल, असा भाजपला विश्वास आहे, तर दुसरीकडे काँग्रेसने आपल्या नेत्यांना मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला कोणत्याही परिस्थितीत विरोध करण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. पक्षाच्या संसदीय रणनीती समितीची बैठक शुक्रवारी खासदार सोनिया गांधी यांच्या निवासस्थानी झाली. या बैठकीत लोकसभा आणि राज्यसभेतील काँग्रेसच्या खासदारांनी सहभाग घेतला. बैठकीला उपस्थित असलेल्या सूत्रांनुसार, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, विरोधी पक्षांकडे विधेयक रोखण्यासाठी पुरेसे संख्याबळ असो वा नसो, काँग्रेस मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला तीव्र विरोध करेल. त्यांनी असेही म्हटले की, भाजप स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी हे विधेयक पुन्हा आणत आहे. राहुल गांधी यांनी अद्याप या बैठकीसंदर्भात कोणतेही सार्वजनिक विधान केलेले नाही. काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी सांगितले की, बैठकीला दोन्ही सभागृहांचे खासदार उपस्थित होते आणि शनिवारी या विषयावर पुन्हा चर्चा केली जाईल. या बैठकीत राहुल गांधी यांनी, गेल्या वेळेस जसे केले होते, त्याचप्रमाणे मतदारसंघ पुनर्रचना विधेयक हाणून पाडण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावू, यावर जोर दिला. गेल्या लोकसभा निवडणुकीत ४०० जागांचा टप्पा ओलांडण्याच्या घोषणेत अपयशी ठरल्यानंतर केंद्र सरकार आता मतदारसंघ पुनर्रचनेच्या माध्यमातून राज्यघटनेत बदल करण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु काँग्रेस इतर विरोधी पक्षांसोबत मिळून याला विरोध करेल, असा दावा काँग्रेसने केला. राहुल गांधी यांनी द्रमुक, समाजवादी पक्ष, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि इतर काही विरोधी पक्षांचा उल्लेख केला असून बरेच काही त्यांच्या निर्णयावर अवलंबून आहे. गौरव गोगोई यांच्या म्हणण्यानुसार, काँग्रेस ५४३ जागांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची मागणी करत आहे. सरकार प्रथम मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्तपासणी आणि मतदार याद्यांमध्ये कथित फेरफार करून कोण मतदान करू शकते आणि



कोण नाही हे ठरवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यानंतर, मतदारसंघ पुनर्रचनेच्या माध्यमातून कोण कुठे मतदान करू शकते, याचा कट रचला जात आहे.

तोंडाला कुलूप लावून बसायचं का? रोहित पवारांच्या नव्या ट्विटने खळबळ, सुनेत्रा पवारांचे नाव घेत.....

वृत्तसंस्था-मुंबई

पुण्यात एका आरोपीवर न्यायालयाच्या आवारात कोयत्याने सपासप वार झाल्याने राज्यात एकच खळबळ उडाली. या घटनेचे धक्कादायक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या घटनेनंतर राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा गंभीर झाला असल्याची टीका विरोधकांकडून केली जातेय. आमदार रोहित पवार यांनी तर पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरच अप्रत्यक्षपणे टीका केली. त्या अजितदादांसारखं काम करत नाहीयेत. अजितदादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही, असं मोठं विधान रोहित पवार यांनी केलं. त्यानंतर मोठा राजकीय वाद उफाळला. त्यानंतर रोहित पवार यांनी मी सुनेत्रा काकींच्या व्यक्तिगतरित्या माफी मागतो, असं सांगून वादावर पडता टाकण्याचा प्रयत्न रोहित



पवार यांनी केला. दरम्यान, रोहित पवारांनी आता नवी भूमिका घेतली आहे. त्यांनी ट्विटरवर लिखित स्वरुपात आपली भूमिका मांडली असून त्यांनी गुन्हेगारीवर आम्हा बोलायचं नाही का असा सवाल करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पालकमंत्रिपदावर नव्याने भाष्य केलंय. प्रशासनावर मजबूत कमांड असलेल्या अजितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही, ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. स्वतःचं वेगळं अस्तित्व प्रत्येक व्यक्ती निर्माण करु शकतो.. पण हा त्यांच्या कष्टाचा आणि जिद्दीचा विषय आहे. तसं अस्तित्व सुनेत्रा काकीही निर्माण करतील, याबाबत आमच्या मनात कोणतीही शंका नाही. पण दादा गेल्यानंतर पुणे आणि बारामतीत गुन्हेगारी ज्या वेगाने वाढली, त्यावर आम्ही बोलायचं नाही का? असा सवाल रोहित पवारांनी केलाय.

नवी नव्हे,कमी वेतन संहिता !



महाराष्ट्र सरकारने नुकतीच केंद्र सरकारने तयार केलेली ङ्क वेतनविषयक संहिता २०१९ म महाराष्ट्रात लागू केली. वेतन संहिता २०१९ ही मुख्यतः जुन्या चार कामगार कायद्यांचे एकत्रीकरण आहे. ते कायदे म्हणजे वेतन अदा करण्याबाबतचा कायदा १९३६, किमान वेतन कायदा १९४८, बोनस कायदा १९६५ आणि समान कामाला समान वेतन कायदा १९७६. नव्या कायद्यात नवे-जुने काय आणि त्याचे परिणाम कोणते? याचा विचार करू. आजपर्यंत किमान वेतन हे किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार ङ्कअनुसूचित रोजगारांना(म्हणजेच उद्योगांना)फ उद्योगनिहाय (जसे इंजिनीअरिंग-बांधकाम-बिडी-दुकाने कचेऱ्या इ. ६७ उद्योगांना) निश्चित करून लागू होत होते. त्यांची निश्चिती ही राज्य पातळीवर नेमलेल्या उद्योजक-कामगार-सरकार यांच्या प्रतिनिधींच्या समितीच्या शिफारशींच्या आधारे राज्य सरकारकडून केली जात होती. आता यामध्ये दोन अत्यंत मूलभूत असे बदल केले आहेत. एक, राष्ट्रीय किमान वेतनाची निश्चिती राष्ट्रीय पातळीवरून केंद्र सरकार त्यांनी नेमलेल्या सल्लागार मंडळांच्या शिफारशीचा विचार करून करेल. त्यानंतर राज्य सरकार आपापल्या राज्यांमध्ये सल्लागार समित्यांच्या शिफारशींच्या आधारे किमान वेतन निश्चित करेल. मात्र ते राष्ट्रीय पातळीवर ठरलेल्या किमान वेतनापेक्षा कमी असू शकणार नाही. दुसरे, त्यामध्ये उद्योगनिहाय किमान वेतन ही संकल्पना हद्दपार करण्यात आलेली आहे. आता त्या त्या राज्यातील उद्योगातील कामगारांना एकच किमान वेतन लागू होईल. त्यामध्ये चार कौशल्य पातळ्या आणि राज्यांतील तीन प्रादेशिक विभागांनुसार कमी-जास्त केले जाईल. केंद्र सरकार त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रदेशांत आणि उद्योगांत वरील प्रमाणेच किमान वेतन दर जाहीर करेल. सरकारने असे सांगितले आहे, की आता किमान वेतन कायदा पूर्वीच्या कायद्याप्रमाणे विशिष्ट उद्योगांनाच केवळ लागू राहणार नाही, तर कोणत्याही उद्योगातील-आस्थापनेतील कोणत्याही कर्मचाऱ्याला या नव्या कायद्यांतर्गत जाहीर केलेले किमान वेतन हे द्यावेच लागेल. सरकारला असे सुचवायचे आहे की, आता आम्ही किमान वेतन कायदा हा सार्वत्रिक केला आहे. कोणालाही हे स्वागतार्ह असल्याचा भास होईल. पण या तरतुदी बहुसंख्य कामगारांच्या मुळावर घाव घालणाऱ्या आहेत. आज महाराष्ट्रात ६७ उद्योगांसाठी ६७ किमान वेतनाचे दर आहेत. ते कशामुळे? कारण, किमान वेतन निश्चित करताना त्या उद्योगातील कामगारांकडून होणारी मूल्यवृद्धी, शहरी ग्रामीण या फरकासहित आवश्यक खर्च, कौशल्य पातळी या घटकांचा विचार करून हे वेतन निश्चित केलेले आहे. आपण उदाहरणादाखल या घटकांच्या आधारे ठरलेली आणि कित्येक वर्षे अस्तित्वात असणारी महाराष्ट्रातील काही उद्योगांतील कायदेशीर किमान वेतनाची पातळी भिन्न कशी आहे, ते पाहू. यात दिसते आहे, की बांधकाम उद्योगांतील अकुशल कामगाराचे किमान वेतन विडी उद्योगातील अकुशल कामगाराच्या किमान वेतनाच्या सव्वादोनपट आणि इंजिनीअरिंग उद्योगातील अकुशल कामगारापेक्षा सव्वापटीहून अधिक आहे. कारण बांधकाम नियोक्त्याची आर्थिक आमदनी ही तेवढ्याच आकाराच्या विडी किंवा अन्य उद्योगापेक्षा अधिक असते. याचा विचार करूनच हे वेतन संबंधित किमान वेतन समित्यांनी ठरविले आहे. यावर सरकारचा असा युक्तिवाद असेल, की कामगाराला किमान जगण्यासाठी आवश्यक तेच द्यायचे असेल, तर ते सर्व उद्योगांना समानच असायला हवे. त्यामध्ये अधिक काही मिळवायचे असेल, तर ते त्या कामगारांनी त्या त्या उद्योगातील नियोक्त्यांशी वाटाघाटी करून किंवा बाजाराच्या नियमानुसार मिळवावे.



The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

इंडिया आघाडीत फूट! शरद पवारांचा काँग्रेस हायकमांडला संदेश?

मुंबई



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष डिलिमिटेशन विधेयकाला पाठिंबा देणार असल्याचे चित्र दिसत आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधेयकाला पाठिंबा देण्याचा निर्णय झाल्याचेही म्हटलं आहे. इंडिया आघाडीमधील महत्त्वाचे नेते असलेल्या शरद पवार यांनीच विरोधात भूमिका घेतल्याने आता काँग्रेस नेमकी काय भूमिका घेणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. अशातच आता दिल्लीमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, राज्यसभेचे खासदार शरद पवार यांनी काँग्रेस हायकमांडला संदेश पाठवल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या खासदारांची भाजपशी चर्चा झाली असून ते विधेयकाच्या समर्थनात उभे राहणार असल्याचा निरोप शरद पवार यांनी काँग्रेसला दिला असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शरद पवार यांनी या निर्णयामागील कारणही स्पष्ट केले आहे. पक्ष एकसंध ठेवण्यासाठी विधेयकाला समर्थन देण्याची वेळ आल्याची माहिती शरद पवार यांनी काँग्रेसला दिल्याचे विश्वसनीय सुत्रांनी म्हटलं आहे. एकीकडे काँग्रेस या विधेयकाविरोधात विरोधकांची मोट बांधत असतानाच शरद पवार यांनी घेतलेल्या भूमिकेने इंडिया आघाडीत मोठी फूट पडणार असल्याचे चिन्ह दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून सर्वप्रथम जितेंद्र आव्हाड यांनी डिलिमिटेशनला पाठिंबा देण्याबाबत पक्षाची भूमिका मांडली होती. डिलिमिटेशनबाबत शरद पवार यांनी एकदा अनौपचारिक चर्चेत म्हणाले होते की, मतदारसंघ पुनर्रचना गरजेचे असते. डिलिमिटेशन हे घटनात्मक आहे, ते करावे लागते त्याला पर्याय नसतो असे मला साहेब म्हणाले होते. सुप्रिया सुळे यांचीही आठ खासदारांशी याबाबत चर्चा झाली आहे. डिलिमिटेशनला पाठिंबा देण्याचा आमचा निर्णय झाला असल्याचे जितेंद्र आव्हाड म्हणाले होते. दुसरीकडे, राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हेंनी मात्र याबाबत निर्णय झाला नसल्याचे म्हटलं आहे. डिलिमिटेशन बिलाची प्रत हातात आल्यानंतर आम्ही निर्णय घेऊ असं अमोल कोल्हेंनी म्हटले आहे.

चंद्रकांत पाटलांच्या पक्ष सोडण्याच्या हालचाली, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी प्रतिक्रिया



एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांच्या जळगावमध्ये पक्षाला मोठा हादरा बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जिल्हा बँकेच्या महायुतीमध्ये एकही जागा न मिळाल्याने मुक्ताईनगरचे शिवसेनेचे आमदार चंद्रकांत पाटील हे नाराज असल्याची चर्चा आहे. या नाराजीवरुन ते पक्षाला थेट सोडचिठ्ठी देणार असल्याचेही सांगितले जात आहे. शिवसेना सोडून ते भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. मंत्री गुलाबराव पाटलांनी त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केल्याचे प्रयत्न केले आहेत, पण त्याचाही काही उपयोग झाला नसल्याचे समोर आले आहे. याप्रकरणावर आता उपमुख्यमंत्री आणि शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांची मोठी प्रतिक्रिया समोर आली आहे. चंद्रकांत पाटील यांच्या नाराजीची दखल आता शिंदेंनी घेतली आहे. ते म्हणाले की. चंद्रकांत पाटील हेही आमचा परिवार आहे. काही नाराजी असेल तर त्यांच्याशी चर्चा केली जाईल. मी त्यांच्याशी बोलतो. परिवार आहे. कुटुंब आहे आमचं, त्यांची काय अडचण असेल, ती सोडविली जाईल, असे मोठे वक्तव्य एकनाथ शिंदे यांनी केले आहे. शेतकऱ्याच्या मागे सरकार मोठ्या ताकदीने उभे आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर आम्ही गेलो शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे दुष्काळ जाहीर केला. सगळे मंत्रिमंडळ बांधावर गेले. शेतकऱ्यांच्या खात्यात अग्रिम मदत देखील जमा झाली . शेतकऱ्यांच्या मागे ताकदीने उभे राहण्याची आवश्यकता आहे. पाणी, जनावरांना चारा देण्याचे काम सरकार करेल. शिवसेना देखील शेतकऱ्यांच्या मागे उभी आहे. दुष्काळ असताना हजारो लाडकी बहिण भाऊ आले त्यांना नतमस्तक होतो, असंही यावेळी शिंदे म्हणाले. कर्जतमधील वृक्षतोड प्रकरणावर एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया दिली आहे. असे कोणतीही कार्यवाही निर्णय झालेला नाही. पर्यावरण पुरक प्रकल्प आमही करू. पर्यावरण जतन करणे हे सरकारचं काम आहे. सगळीकडे आरोग्य सुविधा वाढत आहे . शेतकऱ्यांचे लाडक्या बहिणीवर आरोग्य सुदृढ असले पाहिजे ही सरकारची भूमिका आहे. या वेळचा दुष्काळ मोठा आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर गेलो. शेतकऱ्यांचे आम्ही ऐकूण घेतले. तीन महिन्याचा शिधा देण्याचे ठरले आहे, असं ही यावेळी शिंदेंनी स्पष्ट केलं.

डिलिमिटेशन बिलावरून अमोल कोल्हेंची वेगळी भूमिका



केंद्र सरकार संसदेच्या विशेष अधिवेशनात मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजुरीसाठी आणणार आहे. दोन्ही सभागृहांत विधेयक मंजूर व्हावे यासाठी भाजपाकडून प्रयत्न केला जातोय. या विधेयकाला शरद पवार यांचा पक्ष पाठिंबा देऊ शकतो, असे सांगितले जातेय. विशेष म्हणजे पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तर आम्ही या विधेयकाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतलाय, असं सांगून टाकलंय. असं असताना पवार गटातून आव्हाड यांच्या मताशी विसंगत भूमिका समोर येत आहे. खासदार अमोल कोल्हे यांनी टीव्ही ९ मराठीशी बातचित करताना आव्हाड यांच्या मतापेक्षा वेगळे मत मांडलेय. त्यामुळे पक्षात नेमकं काय घडतंय? असं विचारलं जातंय. यावेळी बोलताना ङ्गङ्घअजून हा निर्णय झालेला नाही. केंद्रीय मंत्रिमंडळाने विधेयक मंजूर केल्यानंतर माध्यमात तीन मुद्दे समोर आले. कदाचित याच तीन मुद्द्यांवरून जितेंद्र आव्हाड यांनी विधान केले असावे. परंतु विधेयकाचा मसुदा जोपर्यंत आमच्या हातात येत नाही. तो मसुदा आम्ही जोपर्यंत पूर्ण वाचत नाही, तोपर्यंत कोणताही निर्णय होणार नाही,फ्फ असं अमोल कोल्हे यांनी स्पष्ट केलं. विधेयकाचा मसुदा समोर आल्यानंतर आम्ही सगळे खासदार एकत्र बसून चर्चा करू. त्यानंतर पक्षनेतृत्त्वाशी चर्चा करून याबाबत निर्णय घेतला जाईल, असंही त्यांनी सांगितलं. पुढे बोलताना पक्षाने व्हिप जारी केलाय. हा व्हिप विशेष अधिवेशनाला उपस्थित राहण्याबाबत आहे. दुसरी बाब म्हणजे अजूनही ड्राफ्ट आलेला नाही, निर्णय कसा होईल, असा सवालही त्यांनी केला. एप्रिल महिन्यात हे विधेयक आले होते, त्याला आम्ही विरोध केला होता. कारण त्यात लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची पुनर्रचना होईल, अशी तरतूद होती. या तरतुदीमुळे दक्षिणेतील राज्यांना मोठा फटका बसणार होता. सरसकट ५० मतदारसंघ वाढले तर आम्ही यावर विचार करू, अशी काँग्रेसची भूमिका त्यावेळी होती. माध्यमांतील माहितीनुसार केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेल्या बिलात सरसकट ५० टक्क्यांची अट आहे. त्यामुळे विधेयक जेव्हा संसदेत मांडले जाईल, ते आम्ही वाचणार नाही तोपर्यंत आम्ही कसा निर्णय घेऊ शकतो, अशी रोखठोक भूमिका अमोल कोल्हे यांनी केली. त्यामुळे आता पवारांचा राष्ट्रवादी पक्ष नेमकी काय भूमिका घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

बाळ अंध असल्याने गर्भपाताचा तगादा, माऊलीने तरीही लेकराला जन्म दिला; अंध आई अन् लेकराला संपवलं

■ जळगाव/वृत्तसंस्था



ज्या डोळ्यांना कधी जग पाहता आलं नाही, त्या अंध मातेला विहिरीच्या पूजा करण्याच्या बहाण्याने प्रत्यक्ष मृत्यूच्या दारात नेलं जाईल, याची पुसटशीही कल्पना नव्हती. आपल्या अंध पत्नी आणि तीन वर्षाच्या अंध मुलाला विहिरीत ढकलून हत्या केल्याची संतापजनक घटना जळगाव जिल्ह्यात घडली आहे. यावल तालुक्यातील किनगाव येथील दोघेही पती-पत्नी अंध असल्यानं जन्माला आलेलं अपत्यही अंध जन्माला आलं. याच रागातून सासू आणि पतीने मिळून एका साडेतीन वर्षाच्या निष्पाप अंध बालकाला विहिरीत फेकून देऊन त्याचा खून केला. तर सुनेलाही विहिरीत ढकलून मारण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना किनगाव शिवारात घडली आहे.काल सोमवारी रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास किनगाव शिवारातील आरोपींच्या मालकीच्या शेतात ही घटना घडली. फिर्यादी सरस्वती स्वप्निल पाटील (वय 27) आणि तिचा पती स्वप्निल भागवत पाटील (वय 34) हे दोघे विहिरीची पूजा करण्यासाठी शेतात गेले होते. यावेळी विहिरीजवळ असताना सासू आशाबाई भागवत पाटील हिने सरस्वती आणि तिच्या साडेतीन वर्षाच्या मुलाला विहिरीत जोराचा धक्का देऊन पाडलं.विहिरीत पडल्यानंतर सरस्वतीने तेथील लाकडी फाउंडेशनचा आधार घेतल्याने ती बचावली. विहिरीत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्या मातेनं काळजाचा थरकाप उडवणारा टाहो फोडला, पण दुर्दैवाने तिच्या कुशीतील सोन्यासारख्या चिमुकल्याचा पाण्यात गुदमरून अंत झाला. पोटच्या गोळ्याला कायमचं गमावल्याचं अथांग दुःख आणि रक्ताच्याच नात्यांनी केलेल्या या अमानुष विश्वासघातामुळे ती अंध माता आज सुन्न होऊन अश्रू ढाळत आहे. अंध मुलगा कृष्णा पाण्यात बुडाल्यानं त्याचा जागीच मृत्यू झाला. सुरुवातीला ही घटना केवळ एक अपघात असल्याचा बनाव करण्यात आला होता. विहिरीत पडल्यानं महिला जखमी झाली होती, तिला तातडीने सिव्हिल हॉस्पिटल, जळगाव येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं.सुरुवातीला मानसिक धक्क्यामुळे तिने पोलिसांना कोणताही जबाब दिला नव्हता. त्यामुळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. परंतु, घटनेची वेळ आणि परिस्थिती संशयास्पद वाटल्यानं, लहान मुलाच्या अंत्यविधीनंतर रात्री उशिरा पोलिसांनी जखमी महिलेची सखोल विचारपूस केली. यावेळी महिलेनं तिच्यासोबत घडलेला हा क्रूर प्रकार पोलिसांसमोर मांडला. सासूने विहिरीत ढकललं आणि त्यात पतीचाही सहभाग असल्याची तक्रार तिने नोंदवली. या घटनेमागील कारण अत्यंत वेदनादायी आहे.फिर्यादी सरस्वती ही 70 टक्के अंध असून तिचा पती स्वप्निल हा 100 टक्के अंध आहे. गर्भधारणेदरम्यान सोनोग्राफीमध्ये होणारं बाळही अंध असेल, असं डॉक्टरांनी सांगितलं होतं. त्यामुळे आरोपी पती हा गर्भपात करण्यासाठी दबाव आणत होता. मात्र, सरस्वतीने हट्ट धरून बाळाला जन्म दिला. याच कारणावरून त्यांच्यात सतत वाद होत होते आणि यामुळेच सरस्वती गेल्या अडीच वर्षांपासून तिच्या माहेरी राहत होती. दरम्यान, या वादाचा अंत या दुर्दैवी घटनेनं झाला. या प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २५४/२६, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१) (खून), १०९(१) (खुनाचा प्रयत्न), आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाने तात्परतेने कारवाई करत आरोपी पती स्वप्निल भागवत पाटील आणि सासू आशाबाई भागवत पाटील यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

83 तासांत मोशीतील रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण, कचऱ्याच्या ढिगाऱ्यात 8 जणांचा करुण अंत

■ पिंपरी/वृत्तसंस्था

मोशी येथील कचऱ्याच्या डोंगर तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत आठ कामगारांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी (आठ जुलै) मोशी कचरा डेपो येथे ही दुर्घटना घडल्यानंतर गुरुवारी (नऊ जुलै) पहिला मृतदेह बाहेर काढण्यात आला होता. त्यानंतर शनिवारी (११ जुलै) सात मृतदेह बाहेर काढण्यात आले. या कामगारांव्यतिरिक्त वामन कसबे नावाचा एक कामगार बचाव पथकाला सापडलेला नाही. तो आणि त्याच्या व्यतिरिक्त अजून कोणी ढिगाऱ्याखाली अडकले आहे का, याचा शोध रात्री उशिरापर्यंत सुरू होता. मोशी कचरा डेपो येथे बुधवारी दुपारी एक ते दोनच्या सुमारास कचऱ्याचा डोंगर कोसळून अँटनी लोरा या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची तीन मजली प्रशासकीय इमारत कोसळली. यानंतर पोलिस, अग्निशमन दल, महापालिका प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. 'एनडीआरएफ'ला पाचारण करण्यात आले. या इमारतीमध्ये एकूण २३ कामगार होते. एनडीआरएफ'ला बचावकार्यात अडचणी भासू लागल्याने भारतीय सैन्य दलाला पाचारण करण्यात आले. दोन्ही दलांनी प्रयत्न करून, इमारतीच्या आत अडकलेले सोमनाथ शेळके, सचिन दवडगाव, दादासाहेब आरडे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण, रणवीर सिंह, विजय सपकाळ या कामगारांना बाहेर सुखरूप काढले. गुरुवारी पहाटे भूषण पाटील, महेश राऊत यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

मात्र, गुरुवारी सकाळी भावेश वाणी यांना बाहेर काढले असता त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर, गुरुवारी आणि शुक्रवारी (दहा जुलै) दोन दिवस इमारतीच्या बाजूचा कचरा हटवून आणि इमारतीचा स्लॅब फोडून इतर कामगारांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र, इमारतीच्या आसपासच्या मोठ्या प्रमाणात कचरा असल्याने बचावकार्यात अडथळा निर्माण झाला होता.गुरुवारी दुपारपासून ते शनिवारी (११ जुलै) दुपारपर्यंत हा कचरा हटविण्याचे काम सुरू होते. त्यानंतर शनिवारी दुपारी अडीचच्या सुमारास अक्षय सावंत या कामगाराचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. पाचच्या सुमारास सुनील कोकरे या कामगाराचा मृतदेह बाहेर काढला.

नियतीने आयुष्याला पूर्णविराम दिला, मोशी दुर्घटनेत अवघ्या 25 दिवसांच्या लेकराचं पितृछत्र हरपलं

■ पुणे/वृत्तसंस्था



'यावेळ खूप काम आहे. यावर्षी वारी राहू दे, पुढच्या वर्षी विठूरायाच्या चरणी नक्की जाईन,' असा विचार करून 34 वर्षीय सुनील कोरके बुधवारी 8 जुलै रोजी नेहमीप्रमाणे कामावर गेले. मात्र नियतीच्या मनात काही औरच होतं. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत कॅन्टीनमध्ये बसून जेवायला सुरुवात करण्याआधीच मोशी येथील कचरा डेपो परिसरातील इमारतीवर कचऱ्याचा प्रचंड ढिगारा कोसळला आणि या भीषण दुर्घटनेत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एका क्षणात कोरके कुटुंबाचा आनंदी संसार उद्ध्वस्त झाला.मूळचे पंढरपूर येथील असलेले सुनील कोरके हे गेल्या 10 वर्षांपासून पिंपरी-चिंचवड परिसरातील एका खासगी कंपनीत असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत होते. प्रामाणिक आणि मेहनती अशी त्यांची ओळख होती. 10 वर्षांपूर्वी मोठ्या उत्साहात त्यांचा विवाह झाला आणि संसाराला सुरुवात झाली. अवघ्या 25 दिवसांपूर्वी त्यांच्या घरी एका गोंडस मुलाचा जन्म झाला होता. घरात नव्या पाहुण्याच्या आगमनानं कुटुंबात आनंदाचं वातावरण होतं. आपल्या नवजात मुलाला कुशीत घेऊन त्याच्यासाठी अनेक स्वप्ने पाहणाऱ्या सुनील यांच्या आयुष्याला मात्र नियतीने थांबा दिला. पितृत्वाचा आनंद मनसोक्त अनुभवण्यापूर्वीच काळाने त्यांना आपल्या कवेत घेतलं.सुनील यांचे वडील गावाकडे शेती करतात, तर त्यांचा भाऊ अनिल कोरके वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी सांभाळतो. नोकरीनिमित्त शहरात राहत असूनही सुनील यांचे मन कायम पंढरपूर आणि विठ्ठल भक्तीत रमलेले असायचे. दरवर्षी माऊली आणि तुकोबांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन विठ्ठल नामाचा गजर करणाऱ्या सुनील यांना यंदा कामाच्या व्यापामुळे वारीला जाता आले नव्हते. 'यंदा नाही, पुढच्या वर्षी नक्की वारी करेन,' हा त्यांचा निर्धार आयुष्यातील शेवटचा ठरला. एका बाजूला पंढरपूरमध्ये विठ्ठल भक्तांचा जल्लोष सुरू असताना, दुसऱ्या बाजूला त्याच पंढरपूरच्या एका वारकऱ्याची जीवनवारी मोशी दुर्घटनेत कायमची थांबली.मोशी येथील कचऱ्याच्या डोंगर तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत आठ कामगारांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी (आठ जुलै) मोशी कचरा डेपो येथे ही दुर्घटना घडल्यानंतर गुरुवारी (नऊ जुलै) पहिला मृतदेह बाहेर काढण्यात आला होता. त्यानंतर शनिवारी (११ जुलै) सात मृतदेह बाहेर काढण्यात आले. या कामगारांव्यतिरिक्त वामन कसबे नावाचा एक कामगार बचाव पथकाला सापडलेला नाही. तो आणि त्याच्या व्यतिरिक्त अजून कोणी ढिगाऱ्याखाली अडकले आहे का, याचा शोध रात्री उशिरापर्यंत सुरू होता.

दोन महत्त्वाच्या उड्डाणपुलांच्या कामांना वेग; शीव-पनवेल महामार्गावर कोंडी फुटणार

■ मुंबई/वृत्तसंस्था

मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेकडून दोन नव्या पुलांचं काम सुरू होतं. शहरात विद्याविहार रेल्वे उड्डाणपूल आणि मानखुर्द महाराष्ट्र नगर पुलाचं काम वेगाने सुरू असून या दोन्ही प्रकल्पांसाठी डेडलाइन दिली आहे. अनेक काळापासून प्रलंबित पुलांचं काम पूर्ण झाल्यावर विद्याविहार आणि शीव-पनवेल महामार्गावर वाहतूक कोंडी फुटणार आहे.मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रक्लप) अभिजीत बांगर यांनी शनिवारी दोन्ही प्रकल्पांची पाहणी केली आणि त्यावेळी ही अपडेट दिली. तब्बल ३५ वर्षांची प्रतीक्षा संपणार असून, विद्याविहार रेल्वे उड्डाणपुलाचं काम ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले आहेत. या पुलाचं तब्बल ८०% टक्के काम पूर्ण झालं आहे. विद्याविहारमध्ये पूर्व ते पश्चिम प्रवास करताना तब्बल ४० ते ४५ मिनिटं वेळ जातो. पण या पुलाचं काम पूर्ण होताच विद्याविहार पूर्व ते पश्चिम प्रवास १० ते १५ मिनिटांत करणं शक्य होणार आहे.या उड्डाणपूल ६५० मीटर लांब असून पूर्वेतील लाल बहादूर शास्त्री मार्गाला (LBS Road) पश्चिमेतील रामकृष्ण चेंबूरकर मार्गाशी जोडणार आहे. थेट मध्य रेल्वेच्या रुळांवर हा पूल उभारला आहे. या पुलासाठी पहिला प्रस्ताव महापालिकेकडे १९९१ मध्ये मांडला होता. त्यानंतर २०१६ मध्ये प्रकल्पासाठी निविदा काढण्यात आली आणि मग बांधकाम सुरू झालं. पण त्यानंतरही अनेक अडथळ्यांमुळे प्रकल्पाच्या बांधकामाला विलंब झाला.

विद्याविहार पुलासाठी १७८ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. १०० मीटर उंच स्टील गर्डरवर मार्ग बांधला आहे. या मार्गाच्या



बांधकामादर्यान तब्बल २१३ झाडं बाधित होणार होती अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यापैकी ७७ झाडं तोडण्यात आली, ८५ झाडांचं पुनर्रोपन करण्यात आलं आणि ५१ झाडं जागेवरच असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. वाहनचालकांसह पादचाऱ्यांसाठी उड्डाणपुलापासून रेल्वे स्थानकांच्या पदपथापर्यंत मार्ग मिळणार आहे. विद्याविहार पुलासह मानखुर्द-महाराष्ट्र नगर उड्डाणपुलाचंही काम वेगाने सुरू असून ऑगस्ट २०२७ पर्यंत हा पूल वाहनचालकांसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती अभिजीत बांगर यांनी यावेळी दिली. शीव-पनवेल महामार्गावर टी-जंक्शनवर सर्वाधिक वाहतूक कोंडी होते. नवी मुंबई, पुणे आणि मुंबईतील वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. सिग्नलवरील ट्रॅफिक जॅममध्ये प्रवाशांना १५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ थांबावं लागतं.या प्रस्तावित पुलावर दोन मार्गिका असतील. हा मार्ग थेट घाटकोपर-मानखुर्द उड्डाणपुलाला जोडणार आहे. शीव-पनवेल महामार्गावरील टी-जंक्शनपासून सुरू होऊन जीएमएलआरपर्यंत पोहोचेल. एक मार्गिका १.४७ किमी लांब आणि दुसरी मार्गिका १.९३ किमी लांब असेल. या मार्गासाठी १,९५८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रत्येक मार्गिका दोन पदरी असेल. ६.५ ते ८.५ रुंदीचे हे मार्ग असतील. घाटकोपरच्या दिशेने नवी मुंबई, मुंबई आणि पुण्याला प्रवास करणाऱ्या वाहनांची कोंडीतून सुटका होणार आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेचा शानदार समारोप

'बॅटन'चा अहमदाबादच्या दिशेने प्रवास सुरू, सांगता सोहळ्यात भारताच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन

■ ग्लासगो, वृत्तसंस्था :

ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा समारोप झाला असून सांगता होत असताना भारताने जगाला पुढील राष्ट्रकुल खेळांसाठी अहमदाबादमध्ये येण्याचे उत्साही निमंत्रण दिले. प्राचीन तत्त्वज्ञान, समकालीन कला आणि सांस्कृतिक भव्यतेचा सुरेख संगम असलेल्या एका सादरीकरणाद्वारे ही जबाबदारी भारताकडे सोपवण्यात आली. यासोबतच 2030 मधील या क्रीडास्पर्धेच्या शताब्दी आवृत्तीच्या दिशेने भारताचा प्रवास अधिकृतपणे सुरू झाला.

रविवारी 'ओव्हीओ हायड्रो' येथे झालेल्या समारोप सोहळ्यातील सर्वांत भावपूर्ण क्षण ग्लासगोने राष्ट्रकुल खेळांची बॅटन अधिकृतपणे भारताकडे सोपविली तो होता. त्यानंतर संगीत, नृत्य आणि कथाकथनाच्या माध्यमातून भारताची जिथे परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर मेळ पाहायला मिळतो, अशी ओळख जगासमोर मांडण्यात आली. राजे चार्ल्स तृतीय यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले प्रिन्स एडवर्ड (ड्यूक ऑफ एडिनबर्ग) यांनी या क्रीडास्पर्धांची सांगता झाल्याची अधिकृत घोषणा केली.

महिलांच्या 57 किलो वजन गटातील बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलेल्या जस्मिन लंबोरिया हिने समारोप सोहळ्यात









भारताचा ध्वज फडकविला. अधिकृत हस्तांतरण प्रक्रियेची सुऊवात राष्ट्रकुल ध्वज मैदानावरून नेण्याच्या प्रतीकात्मक प्रवासाने झाली. स्कॉटिश आणि भारतीय ध्वज हाती घेतलेल्या ध्वजवाहकांच्या नेतृत्वाखालील मिरवणुकीत घडी घातलेला राष्ट्रकुल खेळांचा ध्वज खाली उतरवण्यात आला. त्यानंतर ग्लासगोच्या लॉर्ड प्रोवोस्ट जॅकलीन मॅक्लरेन यांनी तो ध्वज 'कॉमनवेल्थ गेम्स स्कॉटलंड'च्या उपाध्यक्षा सुझान जॅक्सन, स्कॉटिश नेटबॉल खेळाडू एमिली निकोल आणि 'कॉमनवेल्थ स्पोर्ट'च्या प्रतिनिधींकडे सोपवला.

या कार्यक्रमात आकर्षक डिजिटल दृश्यांच्या पार्श्वभूमीवर शेकडो नर्तकांनी भारताच्या विविधतेचे विलोभनीय चित्र उभे केले, तर संगीतकार शंकर महादेवन यांच्या हृदयस्पर्शी संगीताने पाश्चात्य ऑर्केस्ट्राची भव्यता आणि भारतीय संगीत परंपरा यांचा सुरेख संगम साधला. विविध भाषा, रीतिरिवाज आणि कलात्मक परंपरांच्या माध्यमातून जगाचे स्वागत करणाऱ्या एका समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवणे हा या सादरीकरणाचा उद्देश होता. एका विशेष लघुपटाद्वारे आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना अहमदाबाद शहराची ओळख करून देण्यात आली. गुजराती पार्श्वगायिका भूमी त्रिवेदी हिने यावेळी यजमान गुजरातला विशेष मानवंदना दिली. स्कॉटिश संगीत, कविता आणि नृत्याचा समावेश असलेल्या ग्लासगोच्या निरोप समारंभानंतर हा भारतीय कार्यक्रम सादर झाला. स्कॉटलंडची व्हीलचेअर रेसर मेलानी वूड्स हिने 'डेव्हिड डिक्सन पुरस्कार' पटकावला. हा पुरस्कार राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूला दिला जातो. अध्यक्ष डॉ. डोनाल्ड ऊकारे, दोन वेळा ऑलिम्पिक पदक जिंकणारा नीरज चोप्रा, भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पी. टी. उषा आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या प्रसंगी यजमानपदाची जबाबदारी स्कॉटलंडकडून भारताकडे अधिकृतपणे सोपवण्यात आली. त्यानंतर भारताची सांस्कृतिक आणि सभ्यतेची मूल्ये मांडणारे सादरीकरण तीन टप्प्यांत पार पडले. या सादरीकरणाचा मुख्य संदेश 'वसुधैव कुटुंबकम्' हा होता. पहिल्या टप्प्यात 'वंदे मातरम्'च्या 150 व्या वर्धापनदिनाचेही स्मरण करण्यात आले, ज्यामध्ये अभिनेत्री मानुषी चिल्लरच्या नेतृत्वाखालील नृत्याचा समावेश होता. दुसऱ्या टप्प्यात 'सांस्कृतिक जुगलबंदी' या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले भारतीय सतारवादक ऋषभ शर्मा आणि प्रसिद्ध स्कॉटिश संगीतकार रॉस एन्सली यांची जोडी एकत्र आली. शर्मा यांचे सतारवादन आणि एन्सली यांचे स्कॉटिश 'पाईप्सवादन व 'व्हिसल्स' लोकांना रिझवून गेले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शंकर महादेवनने आपली मुले सिद्धार्थ आणि शिवम महादेवन यांच्यासह मंचावर पुनरागमन केले आणि भारताची अत्यंत लोकप्रिय गाणी सादर केली. यामध्ये 'सुनो गौर से दुनिया वालों', 'भाग मिल्खा', 'ए वतन वतन' आणि 'लहरा दो' यांसारख्या गाण्यांचा समावेश होता.

कर्नाटक, झारखंड, मध्यप्रदेश विजयी

■ कोईमतुर, वृत्तसंस्था :

हॉकी इंडियाच्या 16 व्या कनिष्ठ पुरुषांच्या राष्ट्रीय हॉकी चॅम्पियनशिप स्पर्धेतील सातव्या दिवशी झालेल्या विविध सामन्यांत कर्नाटक, झारखंड आणि मध्यप्रदेश या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर शानदार विजय नोंदवित पूर्णगुण वसुल केले.

सोमवारी या स्पर्धेतील खेळविण्यात आलेल्या पहिल्या सामन्यात कर्नाटकाने बंगालचा 4-3 अशा गोलफरकाने निसटता पराभव केला. या सामन्यातील 11 व्या मिनिटाला सुरजकुमार सहाने बंगालचे खाते उघडले. 29 व्या मिनिटाला प्रदीप मंडलने बंगालचा दुसरा गोल केला. नितेश शर्माने 38 व्या मिनिटाला बंगालचा तिसरा गोल करून कर्नाटकावर चांगलेच दडपण आणले होते. 51 व्या मिनिटाला प्रदीप मंडलने कर्नाटकाचा पहिला गोल, अचय्या एम. एम.ने कर्नाटकाचा दुसरा गोल, रेसीन एन्डने 58 व्या आणि अबेद



लुगुनने 60 व्या मिनिटाला कर्नाटकाचा आणि निर्णायक गोल केला. या सामन्यात कर्नाटकाला तीन गुण मिळाले. अ गटातील खेळविण्यात आलेल्या अन्य एका सामन्यात झारखंडने दिल्लीचे आव्हान 4-3 असे संपुष्टात आणले. चौथ्या मिनिटाला झारखंडचे खाते सबीयान किरोने उघडले. 40 व्या मिनिटाला प्रभज्योत सिंगने दिल्लीचे खाते उघडून बरोबरी केली. सबीयान किरोने 47 व्या मिनिटाला संघाचा आणि वैयक्तिक दुसरा गोल केला. सुजित करकेटाने 48 व्या मिनिटाला तर घुरण लोहराने 58 व्या मिनिटाला झारखंडचे गोल केले. दिल्लीतर्फे निशांतने 52 आणि 60 व्या मिनिटाला असे दोन गोल नोंदविले. तिसऱ्या सामन्यात मणीपूरने दादरा-नगर हावेली दिवदमणला 4-4 असे गोल बरोबरीत रोखले. सोमवारी खेळविण्यात आलेल्या शेवटच्या सामन्यात मध्यप्रदेशने तामिळनाडूचे आव्हान 4-0 असे संपुष्टात आणले. तसेच ओदीशाने मणिपूरचा 4-1 असा पराभव केला. हरियाणा आणि मध्यप्रदेश यांच्यातील सामना 2-2 असा बरोबरीत राहिला.

हर्षिता जाखर टूर डी फ्रान्स फेम्समध्ये सहभागी होणारी पहिली भारतीय महिला

नवी दिल्ली : तरुण सायकलपटू हर्षिता जाखरने येथे 'टूर डी फ्रान्स फेम्स'मध्ये सहभागी होणारी पहिली भारतीय महिला ठरून इतिहासात आपले नाव कोरले. या 19 वर्षीय खेळाडूने रविवारी या खडतर शर्यतीच्या दुसऱ्या टप्प्याच्या औपचारिक प्रारंभावेळी अफगाणिस्तान, अल्जेरिया, चिली, इथिओपिया (दोन रायडर्स), नामिबिया आणि युगांडा येथील आठ प्रतिभावान सायकलपटूंच्या गटाचे नेतृत्व केले. ही स्पर्धा 1 ऑगस्ट रोजी लॉझान येथे सुरू झाली असून 9 ऑगस्ट रोजी नीस येथे संपेल. यूसीआय (युनियन सायक्लिस्ट डी इंटरनॅशनल) ने खास निवडलेल्या या संघाने डब्ल्यूसीसी रोड टीमच्या काही रायडर्ससोबत शर्यतीच्या मार्गाच्या एका तटस्थ भागावर 4.5 किलोमीटर सायकल चालवली, असे यूसीआयच्या एका निवेदनात म्हटले आहे. 'टूर डी फ्रान्स फेम्स' ही महिलांची बहु-टप्प्यांची सायकल शर्यत आहे, जी पुरुषांच्या 'टूर डी फ्रान्स'च्या समकक्ष आहे. ही यूसीआय महिला वर्ल्ड टूर कॅलेंडरचा एक भाग आहे.

स्टेज सुरू होण्यापूर्वी, यूसीआयचे अध्यक्ष डेव्हिड लॅपार्टिएंट हे रायडर्ससोबत स्टार्ट पोडियमवर सामील झाले आणि या स्पर्धेत एका भारतीयाला पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. भारताची अत्यंत प्रतिभावान हर्षिता जाखर आमच्या प्रतिष्ठित 'यूसीआय वर्ल्ड सायकलिंग टॅलेंट' कार्यक्रमात सहभागी झाल्याचा आम्हाला आनंद आहे. मला खात्री आहे की तिला 'टूर डी फ्रान्स फेम्स'चा भाग व्हायला आवडेल आणि ती लवकरच प्रत्यक्ष स्पर्धेत भाग घेण्यासाठी परत येईल, असे ते म्हणाले. व्यावसायिक पेलोटॉनच्या पुढे सुरुवात करणाऱ्या या रायडर्सची निवड अशा विविध राष्ट्रीय फेडरेशन्समधून केली जाते.

क्रीडा मंत्री मांडविया यांच्यावतीने वेटलिफ्टिंग पथकाचे कौतुक; धनादेश सुपूर्द

■ मुंबई, वृत्तसंस्था :

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारतीय वेटलिफ्टर्सच्या दमदार कामगिरीचे कौतुक केले आणि ते म्हणाले की, त्यांनी जिंकलेल्या प्रत्येक पदकाने देशाला प्रचंड आनंद दिला आहे.

भारतीय वेटलिफ्टिंग संघाने या खेळांमध्ये एक सुवर्ण, सहा रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले. ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू ही एकमेव सुवर्णपदक विजेती ठरली. भारतात परतल्यानंतर मांडविया यांच्या हस्ते वेटलिफ्टर्सचा सत्कार करण्यात आला. मीराबाईला 30 लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तर रौप्य आणि कांस्य पदक विजेत्यांना अनुक्रमे 20 लाख आणि



10 लाख रुपये मिळाले.तुम्हाला कदाचित याची जाणीव नसेल, पण तुम्ही जिंकलेले प्रत्येक पदक देशाला प्रचंड आनंद देते. जेव्हा जेव्हा तुमच्यापैकी कोणी पदक जिंकले, तेव्हा संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वीच ही बातमी जाहीर केली गेली होती.

जे खेळाडू यावेळी पदक जिंकू शकले नाहीत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की खेळाडू कधीही हरत नाही. ते एकतर जिंकतात किंवा पुन्हा जिंकायला शिकतात,असे मांडविया सत्कार समारंभात म्हणाले. आमच्या तीन खेळाडूंना यावेळी पदके मिळवता आली नाहीत, पण मला खात्री आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वादाने आणि 140 कोटी भारतीयांच्या सदिच्छांनी तेही भविष्यात पदके घेऊन परत येतील, असेही ते पुढे म्हणाले. मीराबाईसाठी हे सलग तिसरे राष्ट्रकुल सुवर्णपदक होते, यापूर्वी त्यांनी 2018 आणि 2022 च्या स्पर्धांमध्येही हे सुवर्णपदक जिंकले होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

25 कोटींचा दावा ठोकलाय त्या व्यक्तीवर हसू येतंय, सिनेमाची इतकी भीती का? दीपाली सय्यद यांचं चाकणकरांना उत्तर

महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स ' चित्रपटावरून सध्या राजकीय वातारणही तापल्याचं पाहायला मिळतंय. नाशिकमधील वादग्रस्त भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांवर आधारित आगामी चित्रपट 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' चा टीझर रिलीज होताच राज्याच्या राजकीय आणि मनोरंजन वर्तुळात एकच खळबळ उडाल्याचं दिसून आलं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेत्री दीपाली सय्यद यांच्याविरोधात २५ कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा ठोकला असून कायदेशीर नोटीस बजावल्याचंही समोर आलं. या सगळ्या वादावर आता दीपाली सय्यद आणि सिनेमाच्या दिग्दर्शकांनी मौन सोडलं आहे.



रुपाली चाकणकर यांनी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेत्री दीपाली सय्यद यांच्याविरोधात २५ कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा ठोकला असून कायदेशीर नोटीस बजावली असल्यानं सिनमाचं काय होणार? याबद्दल चर्चा सुरू होती. आता यावर 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' सिनेमाच्या टीमनं पुण्यात पत्रकार परिषद घेत भाष्य केलं.तर आमचा हा सिनेमा सत्य घटनेवरून प्रेरित असला तरी यात कोणत्याही व्यक्तिचं नाव, कोणत्याही व्यक्तीची ओळख वापरण्यात आली नाहीये. कोणाचीही मानहानी करण्याचा आमचा हेतू नाहीये. रुपाली चाकणकर यांनी २५ कोटींचा दावा ठोकला आहे, त्याला आमटी कायदेशीर म्हणजेच लीगल टीम उत्तर देईल, असं सावंत यांनी म्हटलं.माझे यापूर्वीचे सिनेमे देखील स्त्रीयांवर, मुलींवर झालेल्या अत्याचाराविरोधत आवाज उठवणारे होते, समाजात जागृती करण्याच्या उद्देशानं बनवले होते. या सिनेमाचीही तोच उद्देश आहे, तसंच सिनेमा येत्या २ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होत आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

नमस्कार, मी 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' सिनेमातील कलाकार. आमच्यावर २५ कोटींचा दावा ठोकण्यात आलाय, ज्या व्यक्तीनं आमच्यावर दावा ठोकलाय, त्या व्यक्तीवर मला हसायला येतंय. कारण हा सिनेमा कोणाच्याही जीवनावर आधारित नाहीये, कोणाचा जीवनपट नाहीये. सिनेमात कोणत्याची व्यक्तीच्या नावाचा वापर करण्यात आला नाहीये. महाराष्ट्रात सुरू असलेली भोंदूगिरी आणि या संदर्भात जनजागृती, प्रबोधन करण्यासाठी या सिनेमाची निर्मिती करण्यात येत आहे. आम्ही कलाकार आहोत, त्यामुळे सिनेमासाठी रोक टोक केली जात आहे, ती चुकीची आहे.. असंही दीपाली यांनी म्हटलं. हा सिनेमा होऊ नये यासाठी प्रयत्न केले जात आहेत, म्हणजे तुम्हीच काही तरी चुकीचं केलं आहे का? हे तपासून पाहायला हवं होतं. जे काही होत आहे, ते अत्यंच चुकीचं असल्याचंही दीपाली सय्यद यांनी म्हटलं.

काही महिन्यांपूर्वी नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात यानं महिलांचं शोषण केल्याचं धक्कादायक प्रकरण उघडकीस आलं होतं. या प्रकरणात त्याचे अनेक राजकीय नेते आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी साटेलोटे असल्याचे आरोप झाले होते. याच पार्श्वभूमीवर दिग्दर्शक स्वरूप सावंत आणि निर्माते देवेंद्र भट, सूर्यकांत भुंडे यांनी 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' या चित्रपटाची घोषणा केली. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या चित्रपटाच्या टीझरमध्ये, प्रसिद्ध अभिनेत्री दीपाली सय्यद या रुपाली चाकणकर यांच्याशी हुबेहूब साधर्म्य असलेले, त्यांची हेअरस्टाईल आणि व्यक्तिमत्त्व दर्शवणारे एक महत्त्वाचे पात्र साकारताना दिसत आहेत.

बॉयफ्रेंडमुळे नाकारला गाजलेला सिनेमा, इंडस्ट्री सोडण्याचा घेतलेला निर्णय, वडिलांनी बोलणं टाकलं

अभिनेत्री पूजा भट्टने नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं की, तिचा पहिला चित्रपट 'डॅडी' तिला इंडस्ट्रीमध्ये लाँच करण्यासाठी बनवला नव्हता. पूजानं सांगितलं की, तिच्या पहिल्या चित्रपटानंतर तिनं चित्रपटांमध्ये करिअर न करण्याचा निर्णय घेतला होता. म्हणूनच, जेव्हा तिच्या कुटुंबानं तिला 'आशिकी' मधील भूमिकेची ऑफर दिली, तेव्हा तिनं स्पष्टपणे नकार दिला. सायरस सेज' या यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीमध्ये पूजा भट्ट म्हणाली, 'माझा पहिला चित्रपट मला लाँच करण्यासाठी बनवला नव्हता. माझ्या वडिलांनी मला सांगितलं की त्यांच्याकडे एका १७ वर्षांच्या मुलीची कथा आहे आणि त्यावेळी मी सुद्धा १७ वर्षांची होते. ते म्हणाले की, तू त्या भूमिकेसाठी अगदी योग्य आहे आणि मला ती करायला आवडेल का असं विचारलं. मी त्यांना सांगितलं की, मला विचार करू द्या.'पूजाने सांगितलं की, चित्रपटसृष्टी हे सोपं क्षेत्र नाही हे तिला सुरुवातीपासूनच माहीत होतं. तिनं काही काळासाठी आर्किटेक्ट होण्याचा विचार केला होता आणि अंतराळवीर होण्याचं स्वप्नही पाहिलं होतं.महेश भट्ट यांनी पूजा भट्टला 'डॅडी' चित्रपट करण्याबद्दल विचार करण्यासाठी फक्त २४ तास दिले होते. २४ तासांनंतर जेव्हा ते पूजाशी पुन्हा बोलले, तेव्हा त्यांनी तिला सांगितलं की, जर तिला हा चित्रपट करायचा नसेल, तर ते त्या भूमिकेसाठी डिंपल कपाडिया यांची मुलगी, ट्विंकल खन्नाला संपर्क साधू शकतात. हे ऐकून पूजाने लगेचच चित्रपट करण्यास होकार दिला. या घटनेची आठवण सांगताना पूजा म्हणाली, 'ते मला म्हणाले, 'म्हणजे तुला अभिनय करायचा नाहीये, पण ही भूमिका दुसऱ्या कोणाला मिळावी असंही तुला वाटत नाही. तू याच इंडस्ट्रीसाठी बनली आहेस.' त्यानंतर मी चित्रपट करायचा ठरवला.'पूजाने सांगितलं की, 'डॅडी' सिनेमानंतर तिला 'आशिकी'मध्ये मुख्य भूमिकेची ऑफर आली होती. तिचे काका, मुकेश भट्ट, साइनिंग अमाऊंट घेऊन तिच्या घरी आले होते, पण तिनं तो चित्रपट करण्यास नकार दिला. पूजा त्यावेळी एका मुलासोबत रिलेशनशिपमध्ये होती आणि तिला वाटलं की, त्याच्या गर्लफ्रेंडनं अभिनेत्री व्हावं असं त्याला वाटत नाही. त्यामुळे, तिनं चित्रपटांपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. पण, पूजाच्या बॉयफ्रेंडनं कधीही तिला इंडस्ट्री सोडण्याचा सल्ला दिला नाही. जेव्हा पूजाने 'आशिकी' सिनेमाला नकार दिला, तेव्हा मुकेश भट्ट यांनी महेश भट्ट यांना फोन करून सांगितलं.



स्वत:साठीच गिफ्ट म्हणून केले एग्स फ्रिझ

क्रिती सेनॉनने नुकतीच तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल एक महत्त्वाची गोष्ट शेअर आहे. क्रिती सेनॉन आता 35 वर्षांची आहे. पण तरीही ती अजूनही अविवाहित आहे. अलीकडीच दिलेल्या एका मुलाखतीत तिने सांगितले की, तिने 'एग फ्रीझिंग' (अंडपेशी गोठवून ठेवण्याची प्रक्रिया) करून घेतले आहे. तिने हा निर्णय 'मिमी' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान घेतला होता; त्यावेळी या चित्रपटातील भूमिकेसाठी तिला वजन वाढवावे लागले होते.ह्युमन्स ऑफ बॉम्बे' ला दिलेलया मुलाखतीत करिश्मा मेहताशी बोलताना क्रिती सेनॉनने पहिल्यांदाच 'एग फ्रीझिंग'च्या निर्णयाबद्दल मोकळेपणाने भाष्य केले. ती म्हणाली की, ही कल्पना तिच्या मनात बऱ्याच काळापासून होती, एकदा तिला एकाने सल्ला दिला होता की, संधी मिळाल्यास 'एग फ्रीझिंग' करुन घे. कारण ही अशी गोष्ट आहे जी आपण स्वत:लाच मोठं गिफ्ट म्हणून देऊ शकतो.क्रिती म्हणाली, "मी पहिल्यांदाच हे जाहीर करत आहे की मी माझे 'एग्स' फ्रीझ करून ठेवले होते. मिमी चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान मी अत्यंत विचारपूर्वक हा निर्णय घेतला, कारण त्या चित्रपटासाठी मला वजन वाढवायचे होते. या प्रक्रियेमुळे शरीरावर सूज येते किंवा शरीर फुगल्यासारखे वाटते; आणि त्या काळात मी आधीच वजन वाढवत असल्याने, ही प्रक्रिया करण्यासाठी ती योग्य वेळ असल्याचे मला वाटले."





3 दिवस ऑडिशन, निर्मात्याची घाणेरडी मागणी, खचलेली 'बिग बॉस मराठी' फेम अभिनेत्री; सांगितला प्रसंग

बिग बॉस मराठी ६' मधून प्रसिद्धी मिळवलेल्या अभिनेत्री रेवा कौरासेनं तिच्या करिअरमधील एक धक्कादायक प्रसंग सांगितला आहे. रेवाने खुलासा केला की, तिच्या करिअरच्या सुरुवातीला तिला एका दाक्षिणात्य चित्रपटाची ऑफर आली होती, पण जेव्हा तिला तडजोड करण्यास सांगितलं गेलं, तेव्हा तिनं क्षणाचाही विचार न करता तो प्रोजेक्ट सोडून दिला. रेवानं सांगितलं की, तिला हैदराबादला बोलावण्यात आलं होतं. तिथं तिनं तीन दिवस लुक टेस्ट, कॅमेरा टेस्ट आणि वर्कशॉप केले. रेवा म्हणाली, 'सर्व काही पूर्णपणे प्रोफेशनल वाटत होतं. मला खात्री होती की, मला चित्रपट मिळाला आहे. मला साइनिंग अमाऊंटसुद्धा देण्यात आली होती आणि शुभ दिवशी करारावर सही केली जाईल असंही सांगण्यात आलं होतं.'रेवानं सांगितलं की, काही काळानंतर निर्मात्यांनी तिच्याशी बोलणं बंद केलं. जेव्हा तिनं त्यांच्याशी संपर्क साधला, तेव्हा तिला अप्रत्यक्षपणे सांगण्यात आलं की, चित्रपटाच्या एका निर्मात्याला तिच्याकडून वैयक्तिक गोष्टींची अपेक्षा आहे. अभिनेत्री म्हणाली, 'मला धक्का बसला. त्यावेळी माझी करिअर नुकतंच सुरू झालेलं. कोणी असं काही बोलू शकतं यावर माझा विश्वासच बसत नव्हता.'अभिनेत्री म्हणाली, 'जर हीच अट होती, तर तुम्ही मला सुरुवातीलाच सांगायला हवं होतं. माझा वेळ का वाया घालवत आहात? मी त्याच क्षणी ठरवलं की, मला हा चित्रपट करायचा नाही. मी त्या व्यक्तीशी पुन्हा कधीच बोलले नाही.'चित्रपट सोडल्यानंतर परिस्थिती इतकी बिकट झाली की, निर्मात्यांनी रेवासाठी परतीचं तिकीटही बुक केलं नाही. रेवा म्हणाली, 'मी माझ्या स्वतःच्या पैशाने तिकीट काढलं आणि पुण्याला परत आले. मी इतकी खचले होते की, काय घडलं हे मी माझ्या कुटुंबालाही सांगू शकले नाही.' या घटनेचा रेवावर खूप खोलवर परिणाम झाला. रेवा म्हणाली, 'जवळपास दोन महिने मी कशावरही लक्ष केंद्रित करू शकले नाही. मी माझ्या मित्रांना आणि कुटुंबीयांना आधीच सांगितलं होतं की, मला एक मोठा प्रोजेक्ट मिळाला आहे. पण अचानक रिकाम्या हातानं परत येणं तिच्यासाठी खूप कठीण होतं.'रेवा म्हणाली की, तिनं तिच्या बहिणीला सर्व काही सांगितलं, त्यानंतर ती हळूहळू या घटनेतून सावरली. या घटनेनं तिला खूप काही शिकवला. आता, कोणताही प्रोजेक्ट निवडण्यापूर्वी ती अत्यंत सावधगिरी बाळगते. रेवा म्हणाली, 'या घटनेनंतर मी अनेक चांगल्या दिग्दर्शकांसोबत आणि प्रोडक्शन हाऊससोबत काम केलं आहे. त्यामुळे, मी एका घटनेच्या आधारावर संपूर्ण इंडस्ट्रीवर टीका करू शकत नाही.' 'हिंदुस्तान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये रेवानं घडलेला प्रकार सांगितला आहे.दरम्यान, रेवा कौरासेच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं काही मालिकांमध्ये काम केलं आहे. त्याचबरोबर बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वात अभिनेत्री सहभागी झाली होती.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी

मुख्यमंत्री सहायता निधी आता सोशल स्टॉक एक्सचेंजवर...

गरजू रुग्णांसाठी निधी उभारणीला मिळणार नवे व्यासपीठ

वैद्यकीय उपचारांसाठी अधिक निधी उपलब्ध होण्यास मदत होण्याची अपेक्षा

जनसंचलन-बुलढाणा

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना उपचारांसाठी आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने कार्यरत असलेल्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या कामकाजाला आता सोशल स्टॉक एक्स्चेंजच्या माध्यमातून नवी दिशा मिळू शकते. सोशल स्टॉक एक्स्चेंज हे सामाजिक आणि लोककल्याणकारी कामांसाठी निधी उभारणीचे नियमबद्ध व्यासपीठ आहे. या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या पात्र संस्था आणि देणगीदार यांच्यात समन्वय साधता येतो. राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या नव्या व्यासपीठाद्वारे मिळणाऱ्या अतिरिक्त मदतीचा लाभ राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी होणार आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून हृदयरोग, कर्करोग, किडनी विकार, यकृतविकार, मेंदूविकार तसेच अन्य गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना आर्थिक मदत दिली जाते. मात्र गेल्या काही वर्षात मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे मदत मिळावी यासाठी अर्ज करणाऱ्या रुग्णांची संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सोशल स्टॉक एक्स्चेंजमुळे अशा निधी उभारणीला व्यापक स्वरूप मिळण्याची शक्यता आहे.

सोशल स्टॉक एक्स्चेंज म्हणजे नेमके काय?

सामान्य शेअर बाजारात कंपन्यांचे शेअर्स खरेदी-विक्री केले जातात. मात्र सोशल स्टॉक एक्स्चेंजमध्ये सामाजिक आणि लोककल्याणकारी कामांसाठी निधी उभारणी केली जाते. राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) आणि बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज (बीएसई) येथे सेबीच्या (एसईबीआय) नियमनाखाली हे व्यासपीठ उपलब्ध आहे. पात्र ना-नफा संस्था या व्यासपीठावर नोंदणी करून झिरो कूपन झिरो प्रिन्सिपल या माध्यमातून निधी उभारू शकतात. या माध्यमातून देणगीदारांना सामाजिक कामांसाठी योगदान देण्याची संधी मिळते.

मुख्यमंत्री सहायता निधीला काय फायदा होणार?

निधी उभारणीची नवीन संधी: सामाजिक उपक्रमांसाठी देणग्या व गुंतवणुकीच्या माध्यमातून निधी मिळविण्याचा पर्याय उपलब्ध होतो. मोठ्या देणगीदारांपर्यंत पोहोचणे शक्य: कंपन्यांच्या सामाजिक दायित्व (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधीचा वापर सामाजिक कामांसाठी करण्याचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो. विशेषत: वैद्यकीय उपचारांसाठी मोठ्या निधीची गरज असलेल्या रुग्णांना याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. तसेच कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, मेंदूविकार आणि दुर्मिळ आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी अतिरिक्त निधी उभारण्यास मदत होऊ शकते. सीएसआर फंड देणाऱ्या कंपन्या, मोठे देणगीदार, फाउंडेशन, सामाजिक गुंतवणूकदार आणि इतर निधी पुरवठादार यांच्यापर्यंत पोहोचता येते. नवीन देणगीदारांचा सहभाग: संस्थेच्या कार्याची माहिती व्यापक स्तरावर पोहोचल्यामुळे नवीन देणगीदार आणि सामाजिक क्षेत्रातील भागीदार मिळण्याची शक्यता वाढते. सामाजिक परिणाम मोजण्याची संधी: संस्थेने केलेल्या कामाचा लाभ किती लोकांपर्यंत पोहोचला, किती कुटुंबांचे जीवनमान सुधारले आणि किती सकारात्मक बदल घडले, हे मोजता येते. महाराष्ट्रात आधीच सुरू आहेत निधी उभारणीचे प्रयत्न

मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून कॉर्पोरेट कंपन्या आणि रुग्णालयांच्या सहभागातून त्रिपक्षीय निधी उभारणी तसेच स्वयंसेवी संस्थांसोबत सामंजस्य करार अशा उपक्रमांवर काम सुरू आहे. याशिवाय गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी अतिरिक्त आर्थिक स्रोत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी स्थापन करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीचा मुख्य उद्देश आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचे उपचार थांबवू नयेत हा आहे. सोशल स्टॉक एक्स्चेंजसारख्या निधी उभारणीच्या माध्यमातून सामाजिक सहभाग वाढविणे आणि कॉर्पोरेट क्षेत्राला जोडणे शक्य होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री सहायता निधीची नुकतीच नोंदणी आता सोशल स्टॉक एक्स्चेंजवर करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर याद्वारे मिळणाऱ्या अतिरिक्त मदतीचा लाभ दुष्काळग्रस्त भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी होणार आहे. येत्या काळात दुर्मिळ, महागड्या आणि अत्याधुनिक शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावांची नोंदणी आता या नव्या व्यासपीठावर करण्यात येणार आहे. तसेच त्यामुळे अधिक कॉर्पोरेट कंपन्यांचा सहभाग वाढणार आहे, असे मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

पहाटे ४.१५ पाठलाग, मारहाण अन् बळजबरीने नेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप, ४२ वर्षीय आरोपीला अटक!

जनसंचलन-जळगाव जामोद

पहाटे मैत्रिणीसोबत चालायला निघालेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला मारहाण केली आणि बळजबरीने सोबत नेण्याचा प्रयत्न केला, असा आरोप आहे. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी ङ्गपोक्सोफ्सह गुन्हा दाखल करून ४२ वर्षीय आरोपीला अटक केली आहे. फिर्यादीनुसार, २६ नोव्हेंबर रोजी पहाटे सव्वाचार ते साडेचारच्या सुमारास दोघी गावातील एका प्रवेशद्वाराजवळून जात होत्या. त्या वेळी आरोपीने त्यांचा पाठलाग केला आणि फिर्यादीला चापटा व बुक्क्यांनी मारहाण केली, असा आरोप आहे. आरोपीने मुलीचा हात आणि मान पकडून तिचा विनयभंग केला, तसेच तिला बळजबरीने सोबत नेण्याचा प्रयत्न केला, असे फिर्यादीत नमूद आहे. मुलीच्या फिर्यादीवरून त्याच दिवशी दुपारी ३ वाजून २३ मिनिटांनी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५, ७८, ७९, १२६, १२७ आणि ११५(१) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ८ अंतर्गत गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल पंडित करीत आहेत.



दुष्काळग्रस्तांना सर्वतोपरी मदत हे शासनाचे प्राधान्य

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

जनसंचलन-बुलढाणा



राज्यात दुष्काळाचे मोठे संकट निर्माण झाले असले, तरी शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटात शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांनी खचून न जाता धीराने परिस्थितीचा सामना करावा. संकटाच्या काळात शासन पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. मेहकर येथे मेहकर येथे दुष्काळग्रस्त शेतकरी संवाद मेळावा सेवा संकल्प अभियानात ते बोलत होते यावेळी केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट, आमदार संजय गायकवाड, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण, माजी आमदार संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर तसेच लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेऊन मदत व निधी उपलब्ध करून दिला आहे. शेतकऱ्यांना मदत करताना शासन कधीही हात आखडता घेणार नाही. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविण्यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये. वित्तीय संस्था किंवा फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली अथवा दादागिरी झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची आणि चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी चारा छावण्या, चारा गाड्या तसेच आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करण्यात येत आहे. जलसंधारणाच्या कामांना गती देण्यासोबतच जलतारा यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून भूजल पातळी वाढविण्यावर भर दिला जात आहे. कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचे नियोजन करण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. महिला, विद्यार्थी आणि गरजू कुटुंबांसाठी मदतीचा हात

शेतकरी कुटुंबातील महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांसाठी आरोग्य तपासणी मोहिमा राबविण्याची आवश्यकता असून, गरजू महिलांना शिलाई मशीनसारखे साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, यासाठी आवश्यक मदत केली जाईल. तसेच गरजू कुटुंबांना धान्य किट, मुला-मुलींच्या शिक्षणासाठी आणि विवाहासाठी मदत देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणफ योजना सुरूच राहणार असून, पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुलींचे मोफत उच्च शिक्षण आणि महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत यांसारख्या योजनांचा लाभही नागरिकांना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया तसेच कर्करोग तपासणी व उपचारांसाठी आरोग्य विभागामार्फत विशेष मोहिमा राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्र व राज्य शासन सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी आणि महिलांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असून, दुष्काळाच्या संकटात जनतेला दिलासा देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. जिल्ह्यातील सुमारे तीन हजार शेतकरी कुटुंबांतील मुला-मुलींना सायकलींचे वाटप सुरू करण्यात येत आहे. तसेच शेतकरी कुटुंबातील विधवा, परित्यक्ता आणि गरजू महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी तीन हजार शिलाई मशीन जिल्ह्यात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या वार्षिक सहा हजार रुपयांच्या मदतीत राज्य शासनाकडून आणखी सहा हजार रुपयांची भर घालून शेतकऱ्यांना एकूण १२ हजार रुपयांची वार्षिक आर्थिक मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. बुलढाणा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे नाव देण्यात आले आहे. जळगाव जामोद येथील आयुर्वेदिक महाविद्यालयाचे ऑनलाइन उद्घाटन यावेळी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, खामगाव-जालना रेल्वेमार्गासाठी ५० टक्के निधी देण्याबाबतची कार्यवाही आणि अकोट-संग्रामपूर-जळगाव-बऱ्हाणपूर रेल्वेमार्ग यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मेहकर, बुलढाणा शहरासह जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. दुष्काळग्रस्त शेतकरी आणि नागरिकांच्या मदतीसाठी सामाजिक बांधिलकी जपत केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आपल्या सहा महिन्यांच्या मानधनाची सात लाख ५१ हजार रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे धनादेशाद्वारे सुपूर्द केली. त्यांच्या या योगदानातून दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देण्यात आला. लाभार्थ्यांना विविध साहित्य व अनुदानाचे वितरण कार्यक्रमाच्या शेवटी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गरजू लाभार्थ्यांना ट्रॅक्टर, शिलाई मशीन आणि सायकलींचे वितरण करण्यात आले. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदान व धनादेशांचे वाटप करण्यात आले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

दुष्काळ एल्गार मोर्चाने प्रतापराव जाधव यांच्या पायाखालची वाळू सरकली!

शिंदे मेहकरात, टाले डोणगाव पोलिसांच्या ताब्यात तुपकरांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात!जितकी दडपशाही कराल, तितका संघर्ष अधिक तीव्र होईल!

जनसंचलन-मेहकर

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी मेहकर दौऱ्यावर आले असतानाच डोणगाव पोलिसांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांना ताब्यात घेतले. टाले यांना सकाळपासून पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यात आले आहे. या कारवाईवरून शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी शिंदे आणि केंद्रीय मंत्री प्रता पराव जाधव यांच्यावर जोरदार निशाणा साधला. एकीकडे दुष्काळ संवादाचा दिखावा, तर दुसरीकडे पोलिसी बळावर शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप तुपकरांनी केला. दुष्काळ एल्गार मोर्चामुळे प्रतापराव जाधव यांच्या पायाखालची वाळू सरकली असून संघटनेच्या कार्यकर्त्यांना आणि



त्यांच्या कुटुंबीयांना पोलिसांकडून धमकावले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. जितकी दडपशाही कराल, तितका संघर्ष अधिक तीव्र होईल! आवाज दबणार नाही, लढा थांबणार नाही!फअसा इशारा तुपकरांनी सत्ताधाऱ्यांना दिला.

पेरली तूर, उरला चारा चांगेफळच्या पाच एकरांत उतरला मेंढ्यांचा कळप!

जनसंचलन-संग्रामपूर

पाच एकरांत तूर उभी होती. या पिकातून घरखर्चाला हातभार लागेल, अशी आशा होती. मात्र ऐन खरीप हंगामात पावसाने दडी मारली आणि तुरीला शेंगाच आल्या नाहीत. अखेर चांगेफळ बु. येथील शेतकरी सत्यभामाबाई रामदास म्हसाळ यांनी शुक्रवार, २७ नोव्हेंबर रोजी उभ्या पिकात मेंढ्यांचा कळप चारण्यासाठी सोडला. चांगेफळ बु. शिवारातील गट क्रमांक ५७ मध्ये म्हसाळ यांनी पाच एकरांवर तुरीची लागवड केली होती. बियाणे, मशागत, पेरणी, खते आणि औषध फवारणीसाठी खर्च केला. मात्र पावसाच्या प्रदीर्घ खंडाने हंगामाचा हिशेबच उलटवला. तुरीतून उत्पन्न मिळण्याची आशा मावळली आणि लागवडीसाठी घातलेले पैसेही परत मिळण्याची शक्यता उरली नाही. शेतात पीक दिसत होतं, पण त्यातून विकायला तूर मिळणार नव्हती. अशा अवस्थेत पाच एकरांतील पीक चाऱ्यासाठी सोडण्याची वेळ म्हसाळ यांच्यावर आली. या एका शेतातलं चित्र पावसाच्या



खंडाने परिसरातील शेतकऱ्यांचं आर्थिक गणित किती बिघडलं, हे दाखवून गेलं. पीक हातचं गेलं, मदत खात्यात कधी? हंगामासाठी केलेला खर्च अंगावर असताना नुकसानभरपाईची प्रतीक्षा किती दिवस करायची, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. शासनाने जाहीर केलेली दुष्काळी मदत, नुकसानभरपाई आणि पीकविम्याची रक्कम विनाविलंब थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी चांगेफळ परिसरातून होत आहे.

साखरखेर्डात वाळूची तीन वाहनं अडली ठाणेदार युवराज खडेंच्या दोन धडक कारवायांत ४९.५६ लाखांची जप्ती!



जनसंचलन/ सिंदखेडराजा

मेहकर-चिखली मार्गावर रात्रीचे दहा वाजले होते. गस्तीवर असलेल्या साखरखेर्डा पोलिसांनी संशयावरून दहा चाकी हायवा अडवला. डंपर तपासला, तर त्यात सहा ब्रास वाळू! पोलिसांनी वाहतुकीचा परवाना मागितला, मात्र तो चालकाकडे आढळला नाही. ठाणेदार युवराज रबडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईत हायवा आणि वाळू असा २५ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आचल वाईन शॉपसमोर हायवा थांबवून पोलिसांनी चालक बळीराम प्रकाश मुंढे (रा. नारायणखेड, ता. देऊळगाव राजा) याची चौकशी केली. पंचनाम्यानंतर २५ लाखांचा हायवा आणि २४ हजारांची वाळू पोलिसांनी ताब्यात घेतली. हेड कॉन्स्टेबल लक्ष्मण इनामे यांच्या फिर्यादीवरून मुंढेविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याच मार्गावर १५ नोव्हेंबरला सकाळच्या गस्तीत लव्हाळा फाट्यावर पोलिसांनी दोन ट्रक पकडले होते. दोन्ही ट्रकमध्ये प्रत्येकी चार ब्रास वाळू आढळली. नदीपात्रातून वाळू काढून तिची अवैध वाहतूक केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत २४ लाखांचे दोन ट्रक आणि ३२ हजारांची वाळू असा २४ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त झाला. चालक सौरभ दत्तात्रय म्हस्के (२३) आणि दीपक जनार्दन टाले (२४, दोघे रा. खैरव) यांच्याविरुद्ध कलम ३०३(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. दोन्ही कारवायांत मिळून तीन वाहने आणि १४ ब्रास वाळू असा ४९ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास सहाय्यक फौजदार कडूबा डोईफोडे करीत आहेत.

सिंदखेडराजात आभाळानं पाठ फिरवली रब्बीचा ८० टक्के पेरा हुकला!

गेल्या वर्षी ३८,७१३ हेक्टरवर पेरणी, यंदा जेमतेम ७,८०० हेक्टरवर. रब्बीत मक्याचा पेरा शून्य!



जनसंचलन-सिंदखेडराजा

खरिपात सोयाबीनची झडती घटली, कपाशीची फुलं गळाली, अनेक ठिकाणी बोंडंही फुटली नाहीत. खरिपात झालेलं नुकसान रब्बीत भरून काढण्याची आशा होती. मात्र पाण्याअभावी सिंदखेडराजा तालुक्यात रब्बीचा पेरा गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ८० टक्क्यांनी घटला. गेल्या वर्षी ३८ हजार ७१३ हेक्टरवर रब्बीची पेरणी झाली होती. यंदा ती जेमतेम ७ हजार ८०० हेक्टरपर्यंत पोहोचली. म्हणजे जवळपास ३१ हजार हेक्टरवर रब्बीचा पेरा घटला. जुलैमध्ये समाधानकारक पाऊस झाला. ऑगस्टच्या मध्यापर्यंत रिमझिम सुरू होती. त्यानंतर पावसाने पाठ फिरवली. परतीचा पाऊसही आला नाही. नद्या-नाले कोरडे पडले. उभी पिकं जगवण्यासाठी शेतकऱ्यांनी विहिरी, पाझर तलाव आणि सिंचन तलावांतून पाण्याचा उपसा केला. ज्यांच्याकडे पाण्याची सोय होती, त्यांना काही प्रमाणात पीक वाचवता आलं. कोरडवाहू शेतकऱ्यांना मात्र लागवड आणि मजुरीचा खर्चही वसूल करणे कठीण झाले. रब्बीत सर्वाधिक फटका हरभऱ्याला बसला. गेल्या वर्षी १८ हजार ५३१ हेक्टरवर हरभरा होता. यंदा त्याचा पेरा ४ हजार ५० हेक्टरवर आला. गव्हाचा पेरा ११ हजार ८९६ हेक्टरवरून अवघ्या ८०० हेक्टरवर घसरला. ज्वारीची पेरणीही घटली. गेल्या वर्षी ८५० हेक्टरवर पेरलेल्या मक्याची यंदा रब्बीत पेरणीच झाली नाही. गेल्या वर्षी पीक होतं, भाव नव्हता. यंदा भाव आहे, पण विकायला माल किती उरणार? मोजक्या क्षेत्रावर पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता उरलेल्या पाण्यात पीक काढणीपर्यंत जगवण्याचं आव्हान आहे. त्यात हरभऱ्याला वन्यप्राण्यांचा, तर ज्वारीला पक्ष्यांचा उपद्रव. खरिपाचा खर्च पदरात पडलेला नाही. अशा परिस्थितीत रब्बीतून तो भरून निघेल का, हा प्रश्न सिंदखेडराजाच्या शेतकऱ्यांसमोर आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळींचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य कराव

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळींचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८